# कार्यालय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली.

क्रमांक स.अ.(बांध.)/उष्मा निवारण/ १२१५ / २०२४, दिनांक : १२/०३/२०२४

## टेंडर नोटीस

याद्वारे कळविण्यांत येते की, उष्मा निवारण योजनेअंतर्गत जिल्हा न्यायालय गडचिरोली येथील कुलरची तपाणसी करून दुरुस्ती करावयाची आहे. कुलरमध्ये लागणारे मोटार, पंप, बेरींग, बुश, साप्टींग, बटन, केबल, वुडवुल व देखभाल खर्च इत्यादीचे प्रती नग दर नमूद करुन स्थानिक पातळीवरील इच्छुक दुरुस्ती प्रतिष्ठानांनी कुलर दुरुस्तीसाठी खालील अटी व शर्तीना अधिन राहून कुलर दुरुस्तीच्या दराची सिलबंद निवीदा या कार्यालयाला दिनांक १८/०३/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली या पत्त्यावर पाठवावी. लिफाफ्याचे वरती **''कुलर दुरुस्ती करीता निवीदा''** लिहिणे अनिवार्य राहील.

अटी व शर्ती.

१) दिनांक ०१/०४/२०२४ ते ०७/०६/२०२४ या कालावधीमध्ये वातशितकांची दुरुस्ती व देखभाल करावी लागेल.

२) वातशितकांमध्ये वेळोवेळी उद्‌भवणारा तांत्रिक बिघाड वेळेवर दुरुस्त न केल्यास कुलर दुरुस्तीचे काम दुस-या कारागीरांकडून करण्यांत येईल. आणि त्याप्रित्यर्थ झालेला खर्च स्विकृत प्रतिष्ठानांच्या देयकातून कपात करण्यांत येईल व आवश्यकता भासल्यास मंजूर काम रद्द करण्याची देखील कार्यवाही करण्यांत येईल.

३) वातशितके दुरुस्तीनंतर प्रत्येक विभागामध्ये स्थापित करण्याची जबाबदारी आणि उन्हाळा संपल्यानंतर वातशितके (कुलर) काढणे ते सर्व आईलींग, साफसफाई करुन परत संग्रह खोलीमध्ये सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी संबंधीत प्रतिष्ठानांची राहील. त्यासाठी वेगळी मजूरी प्रदान करण्यांत येणार नाही.

४) वातशितकांमध्ये दुरुस्ती, रिवायडींग, पम्प, पंखा बदलविणे इत्यादी कामे करण्यापूर्वी संबंधीत विभागास सूचना देणे बंधनकारक राहील. सूचना न देता वरील महत्वाचे पार्टस् जोडणी केल्यास त्यासंबंधीचा खर्च न्यायालय मंजूर करण्यांस बंधनकारक असणार नाही.

५) वातशितके (कुलर) दुरुस्ती प्रतिष्ठान ही बेरोजगार सहकारी संस्था असल्यास दर निवीदेसोबत संस्थेची नोंदणी प्रमाणपत्र आणि अनुभव पात्रतेबाबत माहिती जोडणे बंधनकारक राहील.

६) वातशितकांना लागणा-या वस्तुंचे वस्तुनिहाय प्रति नग दर नमुद करावे. मोटरचे रिवायडींग कॉपरची असावी व मोटरची लेखी गॅरंटी नमूद असणे आवश्यक राहील आणि पुरवठा केलेले साहित्य ISI मार्कचे असावे तसेच कूलरला लागणारी वायर, आईल, ग्रीस, नट-बोल्ड हे देखभाल खर्चामध्ये समाविष्ठ आहे. कोणतीही आगावू रक्कम मिळणार नाही.

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, गडचिरोली

सदर नोटीसची एक प्रत बेलीफामार्फत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच जिल्हा न्यायालयाचे संकेतस्थळावर लावून प्रसिध्द करण्यांत यावी.

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, गडचिरोली